# प्रोतिमा बेदी : प्रज्ञा दया पवार यांच्या 'केंद्र व परीघ' या स्तंभ लेखातील एक व्यक्तीचित्रण

**संशोधक**
**कु. अर्पणा शालिकराम गणेर**
श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा

**मार्दर्शक**
**डॉ. संजय केशवराव लाटेलवार**
श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा

---

**सारांश :**

*प्रज्ञा दया पवार यांनी' केंद्र आणि परीघ' या आपल्या स्तंभ लेखनात स्त्रीविषयक जाणीवेवर लेखन केलेले आहे. त्यांचे एकूण लेखन हे स्त्रियांच्या जीवनावर, त्यांच्या आयुष्यात घडलेल्या प्रसंगावर केंद्रित आहे. दलित तमाशगीर, नृत्यांगणा, तळाघळातील नीच म्हणून हिणवणाऱ्या स्त्रीवर ते लेखन करतात. धर्म, जात, राजकारण, स्त्री पुरुष संबंध हे विषय जणू बाईसाठी निषिद्ध. सर्व विषयावर प्रकटपणे आपलं मत मांडणं, लिहिणं म्हणजे पुरुषासारखं लिहितेस असा टोमणा होय. ह्या पातळीवर जाऊन लिहिण्याची किमान सुरुवात म्हणून प्रज्ञा दया पवारांना सांगावसं वाटतं की, लिहित रहा बाई सारखीच लिहित रहा. बाया बाया ज्याप्रमाणे तेच ते विषय घेऊन लेखन करतात, तसं न करता पुरुषाप्रमाणे परखडपणे आपले मत व्यक्त करवे असे प्रज्ञा दया पवार सांगतात. प्रोतिमा बेदी यांच्या 'टाइमपास 'या आत्मकथनाची प्रज्ञा दया पवार यांनी समीक्षा करून 'केंद्र व परीघ' या त्यांच्या स्तंभलेखनात प्रोतिमा बेदी यांच्या व्यक्तिमत्वाचे अप्रतिमपणे चित्रण केलेले आहे.*

**बीजशब्द :** निषिद्ध, परखडपणे, समीक्षा, स्तंभलेखन

---

**प्रस्तावना :**

१९९३ पासून स्वतंत्र विचार आणि दृष्टिकोनामुळे आपले स्थान मराठी साहित्य क्षेत्रात अधोरेखित करणाऱ्या, लेखिका प्रज्ञा दया पवार या आपल्या कविता, कथा, नाटक आणि इतर साहित्यातून विद्रोहाची ताकद याचा परिचय मराठी साहित्याला आणि समाजाला करून देतात. भाषण असो वा वृत्तपत्रीय लिखाण असो, त्यांचे मर्मभेदक विश्लेषण वाचकाला आव्हान देणारे, अंतर्मुख करणारे असते. अशा कवयित्री आणि गद्य लेखिका प्रज्ञा दया पवार कथा, नाटक ललित गद्य व समीक्षालेखन हे विविध वाङ्मयप्रकार अतिशय कौशल्याने हाताळतात. प्रज्ञा दया पवार यांनी देशातील असहिष्णुता आणि तिरष्काराच्या वाढत्या वातावरणाचा निषेध म्हणून त्यांचे साहित्य पुरस्कार राज्य सरकार ला परत करून उक्ती आणि कृती याला समांतर पातळीवर आणणाऱ्या त्या लेखिका आहेत, हे सिध्द करून दाखवले. म्हणून त्यांच्याविषयी प्रसिद्ध लेखक व विचारवंत हरिश्चंद्र थोरात म्हणतात," हे विधान करताना प्रतितयश कवयित्री हा उल्लेख अत्यंत जाणीवपूर्वक करतो आहे. भाषणे अनेक लोक देतात, लेखही अनेक लोक लिहितात, फेसबुकावरच्या पोस्ट तर असंख्य लोक लिहितात तथापि हे सारे करताना लिहिणारी कुठुन आली आहे, ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची ठरते. म्हणूनच येथे लेखिका सर्जनशील साहित्याकडुन आली आहे, या गोष्टीचा विशेष उल्लेख करावा लागतो. कविता या साहित्याच्या जवळ जवळ केंद्रस्थानी असलेल्या साहित्यप्रकारामध्ये स्वतःला सिद्ध करून कवयित्री या पुस्तकामधुन साहित्याच्या सिमारेषे पलिकडे निघलेल्या आहेत."

**प्रोतिमा बेदी: व्यक्तिचित्रण :**

केंद्र आणि परीघ या आपल्या स्तंभ लेखनात 'चित्रीची स्त्री अशी पहावी' यात त्यांनी प्रोतिमा बेदी या

नृत्यांगण विषयी माहिती लिहिलेली आहे. प्रतिमा बेदी यांचा 'टाइमपास' हा आत्मकथन वाचून प्रज्ञा पवार या भारावून जातात. एखादी स्त्री आपलं आयुष्य अशाप्रकारे कसं जगू शकते असा प्रश्न ते करतात.

उगवणाऱ्या प्रत्येक दिवसागणित प्रोतिमा बेदीला अनुभव येतात आणि मावळणाऱ्या प्रत्येक रात्रीत तिचे अनुभव अधिक प्रगल्भ होत जातात. बेदी यांनी आपल्या 'टाइमपास' या आत्मकथनात इतकं स्पष्टपणे अभिव्यक्त केलं आहे की ते वाचून ती व्यक्ती व्याभिचारी असावी असा वाचकाचा समज होऊ शकतो परंतु दया पवार म्हणतात की, "तिच्यासारखं स्वतःशी प्रामाणिक असणं, सत्याच्या गाभ्यापर्यंत जाऊन पाहणं आणि जी स्वच्छ, निकोप पारदर्शकतवृत्ती लागते ती प्रोतिमा बेदी यांच्यात आहे.

प्रोतिमा बेदी यांचा जन्म इ. स. १९४९ रोजी दिल्ली येथे झाला. सुरुवातीला त्या मुंबई येथे मॉडेल म्हणून काम करीत होत्या. १९६९ मध्ये त्यांनी अभिनेते कबीर बेदी यांच्यासोबत लग्न केले. १९७८ मध्ये ते विभक्त झाले कबीर बेदी व परविन बॉबीच्या अफेअर्समुळे ते वेगळे झाले. त्यांना दोन अपत्य झाली. पूजा बेदी आणि सिद्धार्थ बेदी.

१९७५ मध्ये प्रोतिमा बेदी यांनी ओडिसी नृत्य शिकायला सुरुवात केली. या नृत्य प्रकारात खूप वेगवेगळे ताल आणि अवघड हस्त आणि मुद्राभिनयामुळे त्या या नृत्य प्रकाराकडे आकर्षित झाल्या. गुरु केलुचरण मोहपात्रा यांच्याकडे नृत्य शिकण्यास गेल्या. मद्रासच्या गुरू कला निधीकडे अभिनयाचे धडे घेतले. त्यानंतर त्यांनी देशभरात आपली कला सादर करायला सुरुवात केली बेंगलोर जवळ 'नृत्य ग्राम' हे भारतातील पहिले मोफत नृत्य शिकवणारे गुरुकुल त्यांनी स्थापन केले. मुंबईतील पृथ्वी थिएटर मध्ये स्वतःचे नृत्य विद्यालय स्थापन केले.

मुलाची सिद्धार्थची आत्महत्या ही तिच्या आयुष्यातील शोकांतिका. स्किझोफ्रेनियाच्या मानसिक दुखण्यातून सिद्धार्थ ला बाहेर काढण्यासाठी तिने खूप प्रयत्न केले. परंतु ती त्यात अपयशी ठरली. लहानपणी कुरूप असल्यामुळे मिळालेली तुच्छ वागणूक, दहावे वर्षी आते भावाने रोज रात्री बलात्कार करणे, कबीर बेदी सोबत अयशस्वी झालेला विवाह, अनेक पुरुषांशी, ख्यातनाम कलावंत आणि राजकीय नेत्यांशी असणारे लैंगिक संबंध याबद्दल ती काही न लपविता सर्व सत्य लिहिते. न डगमगता जे असेल ते फक्त सत्य बोलणे व लिहणे हा प्रोतिमा यांचा प्रामाणिक गुण आहे, असे वर्णन प्रज्ञा दया पवार करतात.

मुलाच्या मृत्यूनंतर प्रोतिमा बेदी संन्यासी जीवन जगण्याचे ठरवतात. त्या मुंडन करतात आणि संन्यासीचे वस्त्र परिधान करून कैलास मान सरोवराच्या तीर्थयात्रेला जातात. त्याच काळात पिठोरगड जवळच्या मालपा गावात दरड कोसळते व त्या बेपत्ता होतात. काही दिवसांनी त्यांचा मृतदेह भारत नेपाळ सिमेजवळ सापडतो.

आपल्या आत्मकथनात प्रोतिमा बेदी स्वतःबद्दल खरंच सांगतात खरं लिहतात. ते सांगण्याचं सामर्थ्य त्यांच्यात आहे, असे प्रज्ञा पवार सांगतात. त्यांच्या अनेक नात्यांना त्यांनी जिवापाड जपलं. नात्यातला जवळीकपणा जिथे संपला तिथे त्या ठामपणे थांबल्या, पण त्यांनी कोणाबद्दलही मनात कळवटपणा ठेवला नाही. नात्याविषयी असणारी आस्था, विश्वास प्रेम यावर त्या ठाम होत्या. त्यांच्या या अद्भुत गुणामुळेच अनैतिकता चालत असली तरी त्या कायमस्वरूपी, तेजस्वीपणे लक्षात राहतात असे प्रज्ञा दया पवार त्यांच्या ‘केंद्र आणि

परीघ' या स्तंभलेखात लिहतात.

**निष्कर्ष :**

- प्रोतिमा बेदी या आपल्या 'टाइमपास' आत्मकथनात सत्यपणे, प्रामाणिकपणे अभिव्यक्त होताना जाणवतात.
- प्रज्ञा दया पवार यांनी निर्विवादपणे प्रोतिमा बेदी यांच्याविषयी 'केंद्र व परीघ' या त्यांच्या स्तंभ लेखनात लेखन केलेले आढळून आले.

**संदर्भग्रंथ :**


- प्रज्ञा दया पवार, केंद्र आणि परीघ, डिंपल प्रकाशन, मुंबई, २०१६
- निबाळकर वामन, दलित स्वरुप व भूमिका, प्रवाधन प्रकाशन क्र. १३ नागपूर (प्र.आ.), ०१ जून १९८६
- मनोहर यशवंत, दलित साहित्य चिंतन, संघमित्रा बुक हाऊस, नागपूर, १९८८
- पाणतावने गंगाधर, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, नागपूर, १९७६, प्रथम आवृत्ती.